# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे   अंक पहिला   पृष्ठे १४   जानेवारी २०२३   www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०५ पिंजारलेल्या आठवणी

पान ०६ 'रस्म-ए-उल्फत' ची कहाणी

पान ०८ रंगुनी रागांत साऱ्या

पान ०९ त्सिंगीचीअसिधारा यात्रा




पान ३

ओळख चविची, खात्री दर्जाची

श्री. मंदार देशपांडे

# २२ व्या पार्ले महोत्सवाचे शानदार आयोजन





सलग २१ वर्षे सुरू असलेल्या 'पार्ले महोत्सव' ची मालिका अखंड सुरू ठेवत ह्याही वर्षी २२ वा पार्ले महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा झाला. आमदार पराग अळवणी ह्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित विलेपार्ले कल्चरल सेंटर ह्या धर्मादाय आयुक्त कार्यालयांतर्गत नोंदणीकृत सामाजिक संस्थेतर्फे सदर महोत्सवाचे भव्य आयोजन वामन मंगेश दुभाषी मैदान व साठये महाविदयालयात करण्यात आले होते.

कबड्डी, व्हॉलिबॉल, बॉक्स क्रिकेट, शरीर सौष्ठव, चित्रकला, बुद्धीबळ, होम मिनिस्टर, ओव्हर आर्म क्रिकेट, हस्ताक्षर, मेहंदी, रांगोळी, ज्येष्ठ नागरिक इ. स्पर्धांमधून सुमारे १५ हजारहून अधिक स्पर्धकांनी ह्या सात दिवसीय महोत्सवामध्ये सहभाग घेतला. 'वीरा ग्रुप' ने प्रमुख प्रायोजिकत्व स्विकारलेल्या ह्या वर्षीच्या महोत्सवाला 'अर्कांडे ग्रुप' 'झी इन्फ्रा' 'युनिव्हर्सल ग्रुप' आदिंनी देखील महत्त्वपूर्ण सहयोग दिला.

मुंबई उपनगराचे पालकमंत्री मा. श्री. मंगलप्रभात लोढा ह्यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. महोत्सव काळात खासदार पूनम महाजन, विधानसभा अध्यक्ष ना. राहुल नार्वेकर, मुंबई भा. ज. पा. चे अध्यक्ष ॲड. आमदार आशिष शेलार हयांसहीत साहित्य, नाट्य सामाजिक व अभिनय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडापटुंची विशेष उपस्थिती लाभली.

महोत्सवात सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले तर विजयी स्पर्धक व संघ ह्यांना चषक, मेडल्स व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. केवळ मुंबईपुरता मर्यादित न राहिलेल्या ह्या महोत्सवात संपूर्ण देशातून सहभाग घेण्यासाठी संघ व स्पर्धक येतात हीच ह्या महोत्सवाची यशस्वीता ठरते.

दर वर्षी प्रगतीचे एक एक पाऊल पुढे टाकत मार्गक्रमण करीत असलेल्या ह्या महोत्सवाच्या

पान २ वर




## संपादकीय

कोव्हिड महामारीची पुढील लाट येण्याची शक्यता जशी जशी कमी होऊ लागली तसा लोकांचा उत्साह, आत्मविश्वास वाढू लागला आहे व ही 'उसळी' आज सर्वच क्षेत्रात दिसून येत आहे.

महामारीमध्ये ठप्प झालेले किंवा तोट्यात गेलेले अनेक उद्योग आज परत एकदा उभे राहात आहेत. अनेक वर्षे स्वत:च्या मुलाप्रमाणे सांभाळलेला, वाढवलेला उद्योग जेव्हा तोट्यात जातो, बुडतो आणि बंद करायची वेळ येते तेव्हा प्रवर्तकाला काय वाटत असेल, त्याच्या मनाला किती यातना होत असतील याची कल्पना इतरांना येणे कठीण आहे. त्यामुळे कोव्हिडं नंतर सर्वच जण दुप्पट उत्साहाने कामाला लागले आहेत. अनेक परिषदा, प्रदर्शने आयोजित केली जात आहेत. उद्योगाशी निगडीत प्रवास सुद्धा वाढला आहे. ग्राहकांशिवाय म्हणजे पर्यायाने लोकांच्या सहभागाशिवाय कुठलाही उद्योग प्रगती करू शकत नाही म्हणजेच उद्योग धंद्याच्या 'उसळी'चे मुख्य कारण लोकांचा उत्साह आणि त्यांची इच्छाशक्ती हेच आहे.

सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात सुद्धा ह्या उत्साहाची 'लागण' झाली आहे. 'पार्ले महोत्सव' 'पार्ले कार्निवल', 'हृदयेश फेस्टिवल', 'पार्ले स्वर वसंत' ह्यासारखे अनेक उपक्रम आज होत आहेत. अनेक चित्रकारांची प्रदर्शने आयोजित केली जात आहेत. ह्या सर्वांना पार्लेकरांची उत्स्फूर्त आणि उदंड उपस्थिती लाभत आहे. आपले मार्केटसुद्धा गर्दीने फुलुन गेलेले दिसते. गेली तीन वर्षे घरी कोंडून पडलेले लोकं आता परत पर्यटनाकडे वळले आहेत. हिल स्टेशन्स हाऊसफुल झालीयेत.

तसे पहिले तर जानेवारी हा महिना नेहमीच सांस्कृतिक, क्रीडा उपक्रमांनी गजबजलेला असतो. गेल्या जवळ जवळ तीन वर्षांच्या तणावपूर्ण कालखंडानंतर हा कार्यक्रमांचा दौर एखाद्या थंड हवेच्या झुळकेसारखा भासत आहे. आणि हो, ह्या वर्षी थंडी सुद्धा थोडी जास्त व जास्त वेळ जाणवत आहे. अंगावर स्वेटर किंवा शाल आणि क्वचित पहाटे रस्त्याच्या कडेला पेटवलेली शेकोटी, आहाहा !

एकूण काय, Happy Days Are Here Again !

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
सलोनी पाटील
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

पान १ वरून

## २२ व्या पार्ले महोत्सवाचे शानदार आयोजन



घवघवीत यशाचे संपूर्ण श्रेय हे कार्यकर्त्यांचे निरापेक्ष योगदान, प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि उद्देशाला महत्व देत खंबीरपणे पाठीशी उभे रहाणारे प्रायोजक ह्या त्रिसूत्रीला जातं असं निखळ प्रतिपादन महोत्सवाचे जनक पराग अळवणी ह्यांनी करीत 23 व्या महोत्सवाला अधिक उत्तुंग करण्याचा मानस बोलून दाखविला.









# ओळख चविची, खात्री दर्जाची

मराठी माणूस व्यवसायाभिमुख नाही, व्यवसायातील धोके घ्यायला तो उत्सुक नसतो, मध्यमवर्गीय सुशिक्षित घरात शिक्षण अगदी अत्युच्च असलं तरी त्याचा वापर व्यवसायासाठी नाही तर नोकरीसाठी होतो असा सर्वसाधारण समज आहे. पण आता आपण आपल्या पार्ल्यातील उद्योजकांची ओळख करून घेऊया. यात घरोघरी पोहोचलेले व मुख्यत: गृहिणींना आपलेसे वाटणारे म्हणजे पीठवाले देशपांडे आणि त्यांचा टेस्टफॉर लाईफ हा ब्रँड.

आजच्या व्यस्त गृहिणींना लागणारी कणिक तीही प्रत्येकीच्या आवडीनुसार पुरवणारे तसेच वेगवेगळी पीठ, इन्स्टंट प्रॉडक्ट्स तेही पारंपारिक चवीची घरपोच पोहोचवणारे श्री. मंदार देशपांडे, सौ.मिनल देशपांडे आज पार्ल्यात कोणाला माहित नाहीत? वेगवेगळी ४५ प्रॉडक्ट बनवणारी महापे येथील फॅक्टरी, अंधेरी व बोरिवली येथील दोन दुकाने, मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथील ३५/ ४० फ्रेंचाईजी, ९ डिस्ट्रीब्यूटर द्वारे १५०० रिटेल आउटलेटना पुरवठा, सहकार भंडार, अपनाबझार, रिलायन्स फ्रेश येथील मालपुरवठा व ॲमेझॉन आणि डी मार्टला माल पुरवण्याचं प्रचंड काम करणारे श्री. मंदार देशपांडे हे पक्के पार्लेकर. अगदी पार्ले टिळक आणि पार्लाकॉलेजचे विद्यार्थी सुद्धा. वडील आर्किटेक्ट. स्वत:चा व्यवसाय असणारे. त्यात राहायला पार्ल्यात असूनही अशा बिल्डिंगमध्ये की जिथे ते सोडून बाकी सर्व गुजराती, मारवाडी व कच्छी रहिवासी. फक्त व्यवसायाचाच विचार करणारे. मित्र भेटला तोही शिक्षण हे रिस्क वाटणारा आणि व्यवसाय हा यशस्वी होतोच असं मानणारा. त्यामुळे कदाचित मंदार यांचा कल पहिल्यापासूनच व्यवसायाकडेच राहिला असावा.

शाळेत चांगले विद्यार्थी असल्याने त्यांनी मराठी घराच्या परंपरेप्रमाणे प्रोडक्शन इंजीनियरिंग केले. पण आपण व्यवसाय



करायचा हे ठरलेले. त्यामुळे एकही सुट्टी वाया न घालवता प्रत्येक वेळी कोणत्या ना कोणत्या प्रोडक्शनकरणाऱ्या कंपनीत छोटे छोटे ट्रेनिंग करत राहिले. इंजीनियरिंग पूर्ण होताच मात्र वडिलांनी त्यांना आता व्यवसायातच उतर; महिन्याच्या पगाराची सवय लावून घेऊ नकोस; असा मोलाचा सल्ला दिला. त्यातून त्यांनी कॅन्ड आमरसाचा व्यवसाय सुरू केला. त्याचा पुरवठा करताना अनेक दुकानदारांशी मैत्री झाली. त्या सुमारास कॅप्टन कुकने गव्हाचे पीठ बाजारात आणले होते. गृहिणी ते वापरू लागल्या होत्या. पण त्यांना समाधान नव्हते. त्या पिठाच्या पोळ्या, फुलके चक्कीवरील पिठाप्रमाणे जास्त काळ मऊ राहत नव्हते. तसेच पिठाला मैद्याप्रमाणे चिकटपणा होता. बाजारात आणखी ब्रँड होते. पण कोणीच समाधानकारक उत्पादन देत नव्हतं. त्यावर अभ्यास केल्यावर गव्हाचे पीठ जे लोकांना दर दिवशी लागते त्या व्यवसायात मंदार यांनी उतरायचे ठरवले. त्यात त्यांना व्यवसायाची संधी दिसली ती अशा वर्गाकडून जो चांगल्या दर्जासाठी जास्त योग्य पैसे मोजायला तयार आहे. त्या वर्गाची गरज भागवण्यासाठी त्यांनी CFTRI (Central food technology reserve institute) यांच्या 'फ्लोअरमेकिंग इंजीनियरिंग - मैसूर' या संस्थेची मदत घेतली. त्यांच्या लक्षात आले की गव्हाचा मोठा दाणा आणि शांतपणे सावकाश दळणे ही प्रक्रिया गृहिणींना हवी असलेली कणिक देण्यासाठी योग्य आहे व त्यांनी त्याची सुरुवात पार्ल्यात एक छोटेसे दुकान व वसईला छोटे वर्कशॉप यांनी १९९८ मध्ये केली. १९९९ साली त्यांचे मिनलताईंशी लग्न झाले. मनासारखी समविचारी साथ मिळाल्याने व्यवसाय विकसत गेला. जसजसा खप वाढत गेला तसा महापे येथे २००५ ला फॅक्टरी उभी केली.

पिठामध्ये सिहोर, लोकवन, त्यातही जाड बारीक कणिक, मेथीयुक्त, सोयाबीनयुक्त असे प्रकार, भाकरी, बेसन, थालीपीठ वगैरेचीपीठे वाढवत गेले. त्याचवेळी कायमस्वरूपी गिऱ्हाईकांची आणि पुरवठ्याच्या विभागांची व्याप्तीही वाढत गेली. जे आज मुंबई, नवी मुंबई, ठाणे याशिवाय यूएई व सिंगापूर पर्यंत वाढली आहे.आता युके आणि अमेरिकेकडे झेप घेण्याच्या तयारीत आहे. पण त्यासाठी त्यांनी प्रथमपासून भर दिला तो दोन गोष्टींवर. मालाचा दर्जा, सहकाऱ्यांचा विश्वास व गुणवत्ता यात तडजोड न करणे आणि आपले उत्पादन

पान ४ वर



पान ३ वरून

# ओळख चविची, खात्री दर्जाची

विकण्यासाठी अभ्यासपूर्वकआखणी करणे. या दोन्हीसाठी त्यांचं माणसं जोडणं, माणसांचं माणूसपण, त्यांच्या गरजा,अडचणी समजून घेणं आणि वेळेवर योग्य हालचाल, मार्गदर्शन व मदत पुरवणं. या धोरणाने व्यवसायाला योग्य दिशा दिली. आज त्यांनी घडवलेली माणसं स्वत:



धडपडून हा वसा व मार्गदर्शन आपल्या हाताखालील सहकार्यांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांच्याही व्यक्तिमत्त्वाचा विकास करत आहेत. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ऑफिस इन्चार्ज प्राची मॅडम, उत्तर भारतीय असून मराठी होऊन गेलेले एडमिनिस्ट्रेशन इन्चार्ज सुनील निषाद, अकाउंट डिपार्टमेंट सांभाळणारे गणेश, ब्रिजेश आणि रूपाली आणि मार्केटिंग या पुरुषप्रधान व्यवसायात महिला टीम तयार करून शंभर टक्के महिला मार्केटिंग विभाग सांभाळणाऱ्या अस्मिता शिंदे मॅडम. खऱ्या व्यावसायिकाचे हेच तर खरे कौशल्य असते. तसेच पिठाचा दर्जा सांभाळताना उत्तमच कच्चामाल वापरायचा. तसेच त्यात प्रिझर्वेटिव्ह, रंग, केमिकल यांचा पिठाच्या टिकाऊपणासाठी अथवा इतर कोणत्याही कारणासाठी वापर करायचा नाही. त्याऐवजी टिकाऊपणा वाढवण्यासाठी चांगले पॅकिंग तसेच त्यातील मॉइश्चर कंट्रोल करणे अशा संरक्षित गोष्टींचा वापर करण्यावर ते दोघे ठाम आहेत. यापुढे जाऊन त्यांनी स्वत:च्या कंपनीची स्वत:ची लॅब निर्माण केली आहे. ज्यात सेन्सरी, फिजिकल आणि मायक्रोटेस्टिंग होतं. त्यामुळे ग्राहकाच्या आरोग्याची काळजी योग्यपणे घेतली जाते. आजच्या नोकरी करणाऱ्या व्यस्त महिलांना नोकरी सांभाळत कुटुंबाला आरोग्यपूर्ण, घरचे व पारंपारिक चवीचे पदार्थ द्यायची इच्छा असते. त्यामुळे इन्स्टंटपिठामध्ये तीन टप्प्यांत अगदी पंधरा-वीस मिनिटात पदार्थ पानात पडेल असे अनेक पर्याय मंदार व मिनल यांनी दिले. मात्र त्याच्या चवीतही तडजोड होऊ दिली नाही. यासाठी फूड सायन्स आणि न्यूट्रिशन याचे शिक्षण घेतलेल्या मुलींची एक रिसर्च टीम तयार केली. त्यामुळे नुसत्या ढोकळ्याचे सात प्रकार, डोशाचे पाच प्रकार असे अफाट निवडीचे संधी देण्याकडे त्यांचा कल राहिला आहे. या सर्वात त्यांना शंभर टक्के साथ दिली ती त्यांच्या धर्मपत्नीने. मिनलताईंनी. त्या स्वत:सेल्सडिपार्टमेंट व रिसर्च डिपार्टमेंट सांभाळतात. जेआरडी टाटा, शिवाजी महाराज



असे उच्च आदर्श ठेवणारे देशपांडे दांपत्य म्हणूनच प्रत्येक गोष्टींच्या मुळापर्यंत जाते. त्यामुळेच कोरोना काळात व्यवसाय बंद न ठेवता ४०-४५ कामगारांची शासकीय सर्व अटी पाळत त्यांनी फॅक्टरीमध्येच राहायची सोय केली. दोन शिफ्टमध्ये काम करत सर्व घरात अडकलेल्या आपल्या ग्राहकांना घरपोच सेवा पुरवली. आपल्या सहकाऱ्यांनाही जपले व जे कामावर येऊ शकत नव्हते त्यांनाही कोरोना काळात संपूर्ण पगार दिला. त्यामुळे त्यांचा ग्राहक व सहकारी त्यांच्याशी बांधलेले राहिले. अशा व्यावसायिकाचे कौतुक झाले नाही तरच नवल. एनर्जी एफिशियन्सी ऍप्रिसिएशन सर्टिफिकेट त्यांना मिळाले आहेच पण ISO22000 सर्टिफिकेटही चार वर्षांपूर्वीच मिळाले आहे. मात्र आंतरराष्ट्रीय FSSC सर्टिफिकेशनसाठी आता त्यांचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

व्यवसाय हे आळशी माणसांचे काम नाही. त्यामुळे कष्ट करा. धाडसाने तरुण वयातच व्यवसायात उतरा. पूर्ण अभ्यास करून उतरा व मुख्य म्हणजे अगदी लहान वयापासून छोट्या-मोठ्या व्यवसायिक संधीचा उपयोग करून घ्या. आजूबाजूला चालणाऱ्या प्रत्येक उद्योगाचे निरीक्षण करा व भरपूर वाचन करा. तसेच रोज थोडं तरी लिहून ठेवा. असा सल्ला श्री. मंदार देशपांडे आज व्यवसाय … तरुणांना देतात.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०



# विलेपार्ले आनंदोत्सव २०२२

**Vile Parle Carnival 2022**

मागच्या काही काळात कोरोना नावाच्या रोगाने थैमान घातले आणि संपूर्ण मानवी जीवन प्रभावित झाले. कोरोना काळाचा अंत झाल्यानंतर सामान्य लोक त्यांच्या कामासह, व्यवसायाने पुन्हा मार्गावर येत आहेत.

मुंबईमधील विलेपार्ले हे सांस्कृतिक केंद्र मानले जाते. कला, संगीत आणि संस्कृतीची आवड असलेल्या लोकांसाठी ही कर्मभूमी आहे.

नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पार्ल्यात या कार्यक्रमाच्या माध्यमातून आनंद, आकांक्षेचे




वातावरण निर्माण करण्यात आले होते. दिव्यांची रोषणाई ही उत्साह व समृद्धीचे प्रतिक आहे. नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी 'पार्ले आनंदोत्सव'(Vile Parle carnival 2022) हा कार्यक्रम हनुमान रोडवर घेण्यात आला. याची सुरुवात रविवारी २५ तारखेला संध्याकाळी ७ वाजता झाली. हेडगेवार उद्यान आणि पार्ले टिळक विद्यालय इंग्रजी माध्यम मैदान तसेच हनुमान रोड संपूर्ण २ किलोमीटरचा परिसर याठिकाणी विद्युतीय वातावरण तयार करण्यात आले होते जिथे लोक त्यांच्या कुटुंबासह, त्यांच्या मित्रांसह येवून नाच गाण्याचा आणि उत्सवाचा आनंद घेऊ शकले.

या आनंद उत्सवादरम्यान या मैदानात होणाऱ्या लहान मुलांसाठी विविध प्रकारचे खेळ आयोजित करण्यात आले होते ज्यातून मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते आहे. अशा प्रकारचा विलेपार्ल्यातील हा पहिलाच कार्यक्रम आहे, की ज्यामुळे केवळ परिसर सुंदर दिसत नसून विद्यमान व्यवसायांना अतिरिक्त संधी देखील उपलब्ध होत आहेत .




या कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रामुख्याने विलेपार्ले येथील लोकांना एकत्र आणणे हा नसून इतर आसपासच्या उपनगरातील मंडळी देखील या निमित्ताने एकत्र येत आहेत.

ह्या कार्यक्रमात स्थानिक प्राधिकरणांकडून आवश्यक असलेल्या सर्व सावधगिरीच्या उपाययोजना आणि सर्व क्रियाकलाप कायद्याच्या आत राहून पार पाडण्यात आल्या आहेत.

तरी वरील कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक गुरुदत्त प्रभू व गुरचरण सिंह संधू यांच्या तर्फे करण्यात आले.

# पिंजारलेल्या आठवणी

**पार्लेपुराण**

सुन्याच्या घरी लहानपणी माणसाची मांदियाळी असे. दुपारी निजानीज झालेली असे तेंव्हाच भांडीय्या अशी मोठाली हाळी ऐकू येई. एक भांडयाची मोठी टोपली घेतलेली बाई त्या आवाजापाठोपाठदिसें. सुन्याची आई तिला घरी बोलावीत असे. सुन्याला ती बोहारीण आहे हे नंतर नंतर कळू लागले. हाशहुश करीत बोहारीण उंबरठ्यावर बसे. सुन्याला कायम तिच्या टोपलीत काय आहे ह्याचे कुतूहल असे. आई तिला तांब्यातून पाणी आणि गुळाचा खडा देई. नुसतं पाणी कधी देऊ नये अशी सुन्याची आजी सांगत असे. आईसुद्धा तसंच म्हणे. ताई कापड द्या; बोहारीण सुरु करे. आई जुने शर्ट आणि विजार काढून देई. बोहारीण नाक मुरडून मोठाले भांड काढी त्यातून मध्यम आकाराचे मग त्याहून लहान



असे करीत करीत छोटाली वाटी काढून देई. सुन्याला हा भांड्यात भांडे त्यात आणिक भांडे आणिक एक हा खेळ भारी आवडी. सुन्याची आई मात्र तो खेळ न आवडल्यासारखं नाक मुरडी आणि काय ग मेले ही एवढाली वाटी काढून देतेस म्हणून दोन्ही तळहात नाचवीत बोहरणीची आरती काढे. मग बोहरीण सुन्याकडे बोटं दाखवत बाबाचे कपडे द्या, तुमचं लुगडं द्या; अशी याचिका मांडे. आई कपाटात राखून ठेवलेले सुन्याचे जुने कपडे काढून देई. बोहरीण तोंडाने चकचक करीत चहाचे गाळणे काढून देई. टवळे काय माझी चेष्टा करतेस म्हणून डाफरे. ताई लुगडं द्या माझ्यासाठी. आई शेवटी ट्रम्प कार्ड काढल्यासारखं कपाटातून जुन्या साड्या काढून देई. बोहरीण दुधाचे हिंडालियमचे पातेले काढी. आईचा डोळा कढईवर असे. मेले ती कढई दे की. अजून एक लुगडं द्या ताई ; शेवटी आई अजून जुनाली साडी देई आणि कढई पदरात पाडून घेई. तोड पटली की एवढा वेळ घासाघिस करणाऱ्या त्या दोघी घाम पुसून मंद हसत. बोहारीण आवाराआवर करून घेई. तेंव्हा आई काहीतरी आठवल्यासारखं करीत तिला दोन पोळी वर दुपारची भाजी बांधून देई. दमली असशील, भुकेली असशील. सुन्याला नवल वाटे. इतक्या वेळ मेले टवळे म्हणीत घासाघिस करणारी आई खरी का बोहारीणीला गूळ पाणी, भाजी पोळी देणारी आई खरी.

सकाळच्या वेळी कधी अंगणात मोठाली घंटीचा आवाज ऐकू येई. सुन्या खिडकीजवळ धाव घेई. मागोमाग वासुदेव आला ग माई, धान्य वाढा हो माई; अशी हाक येई. वासुदेव अंगणाच्या मध्यभागी येऊन चिपळ्या घेऊन गोल गोलफिरी. अर्ध वर्तुळ फेर धरी. बाया पोर टोर म्हातारी

पान ७ वर








# ‘रस्म-ए-उल्फत’ ची कहाणी

नमस्कार मंडळी !

या नवीन वर्षात मी नवीन लेखमालिका घेऊन येत आहे.. सदाबहार.. गाणी..आपल्या मनातली.. गळ्यातली. हा नवीन लेखन प्रपंच आपल्याला आवडेल अशी आशा आहे.



पाश्चात्य संगीताचे वारे वाहात असताना देखील भारतीय रागांवर आधारित संगीत देणारे संगीतकार मदनमोहन. त्यांच्या संगीत दिग्दर्शनात लताबाईंनी गायलेली दिल की राहें या चित्रपटातली रस्म-ए-उल्फत ही गझल, लताबाईंच्या आयुष्यातील सर्वोत्कृष्ट गीत मानलं जातं. आंतरधर्मीय प्रेम संबंधांवर आधारित हा चित्रपट. अशा संबंधांत अनिवार्य अशी नायिकेच्या मनाची होणारी घुसमट, मनाचा आंतरिक संघर्ष, कश्मकश, साऱ्या भावना व्यक्त करणारं हे गीत. मदनमोहन यांचं संगीत, नक्षलायलपुरी यांचे खोल हृदयातून आलेले, दु:खात भिजवलेले, उर्दू भाषेचा गोडवा घेऊन आलेले शब्द, लताबाईंचा सदाबहार स्वर असा त्रिवेणी संगम. रेहाना सुलतान आणि राकेश पांडे अभिनीत हा चित्रपट लक्षात राहिला तो मुख्यत्वे करून या गाण्यामुळे.






एका गीतकाराला एक गीत लिहिण्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते याचं उदाहरण ही गझल आहे. चित्रपटातल्या या गझलच्या जागेसाठी मदनमोहन यांनी एक धून तयार केली. गीतकार नक्षलायलपुरी यांनी त्यावर गीत लिहिलं आणि मदनमोहन यांच्याकडे दिलं. मदनमोहन यांनी ते नाकारलं कारण धून गझलसाठीची होती. आता पुन्हा शब्द लिहायचे तर जवळ फार मोजका वेळ होता. उद्यावर रेकॉर्डिंग होतं. वेळेत गाणं दिलं नाही तर आपल्या नावाला बट्टा लागेल या चिंतेने ते मदनमोहन यांच्या घरातून बाहेर पडले. सकाळचे अकरा वाजले होते. घरी जाऊन लिहिण्याइतका वेळ नव्हता. त्यामुळे त्यांनी सरळ चौपाटीच्या फूटपाथवर कोपऱ्यात बैठक मारली. मनाच्या घालमेलीमुळे शब्द सुचेनात. विचार करत होते.. इतने कम वक्तमेलिखें तो लिखेंकैसे.. गीत को गझल बनायें तो बनायेंकैसे.. इस मुसीबतसे निकलें तो निकलें कैसे..




Rasm-E-Ulfat Ko Nibhaye To Nibhaye Kaise / रस्म-ए-उल्फ़त को निभाये तो निभाये कैसे

रस्म-ए-उल्फ़त को निभाएं तो निभाएं कैसे
हर तरफ़ आग है दामन को बचाएं कैसे

दिल की राहों में उठाते हैं जो दुनियावाले
कोई कह दे की वो दीवार गिराएं कैसे

दर्द में डूबे हुए नग़मे हज़ारों हैं मगर
साज़-ए-दिल टूट गया हो तो सुनाएं कैसे

बोझ होता जो ग़मों का तो उठा भी लेते
ज़िन्दगी बोझ बनी हो तो उठाएं कैसे



संभ्रमावस्थेत विचार करता करता अचानक मनातली कश्मकश शब्दांत उतरली.. रस्मे उल्फतको निभाये तो निभाये कैसे.. आणि कागदावर झरझर लेखणी फिरु लागली. बघता बघता गझल तयार झाली. ती घेऊन मदनमोहनजींच्या घरी गेले. गझल वाचून मदनजींनी खूप कौतुक केलं आणि दुसऱ्या दिवशी ती गझल रेकॉर्ड सुद्धा झाली. अवघ्या चार तासांत लिहिलेली ही अजरामर गझल आज पन्नास वर्षानंतर तेवढीच लोकप्रिय आहे. सतारीच्या सुरावटीतून सुरु होणारी आणि संपणारी ही मधुवंती रागातली गझल. ही सतार मेवाती घराण्याचे सितारिया रईस खान यांनी वाजवली आहे. मदनमोहन यांनी आपल्या प्रत्येक चित्रपटासाठी सतारीचा कलात्मक वापर केला. ते रईस खान यांना कधीही नोटेशन्स लिहून देत नसत. फक्त गाण्यातली सतारीची जागा आणि गाण्याचा मूड सांगत. त्यानुसार रईस खान सतारीचे तुकडे बसवत. हे अवघड composition लताबाई सहज गाऊन गेल्या आहेत आणि सतारीने हे गाणं कुठल्या कुठे नेऊन ठेवलं आहे. सोबत गीताची लिंक दिली आहे.

https://youtu.be/PTXd‹PWYKOeA



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२









पान ५ वरून

# पिंजारलेल्या आठवणी


कोतारी जमा होत. वासुदेव कृष्णाचे पद म्हणून दाखवी. पोरांना मोठाल्या पिशवीमधून मोरपिस काढून वाटे. बाया त्याच्या झोळीत शेर भर तांदूळ वाढत कधी धान्य देत. वासुदेव ख़ुशीने अधिक डोलत असे. चिपळ्या वाजवत गोल फिरे.



सुन्याला तो वासुदेव भारी आवडे. तो त्याला नारादमुनी म्हणत असे. वासुदेव आला ग बाई वासुदेव आला ग माई म्हणत वासुदेव पुढल्या प्रवासाला निघे. या वासुदेवाच्या पायात आपल्यासारख्या चपला नाहीत याचं सुन्याला थोडं वाईट वाटे.

कधी आठवड्यात ठरावीक वेळी माधुकरी मागतो असा आवाज येई. सुन्या आईला विचारुन दार उघडे. समोर त्याच्यापेक्षा थोडा मोठाल्या वयाचा मुलगा उभा असे. अंगात सदरा आणि धोतर असे आणि पाठीला झोळी असे. सुन्याला बघून माधुकरी मागतो असे तो मोठ्याने म्हणे. एव्हाना आई दाराशी येई. बऱ्याच दिवसाने आलास राज्या म्हणून आई त्याला झोळीत धान्य वाढे. आई त्याला बटू वामन म्हणे. तो माधुकरी शिधा मागून एक वेळेचे जेवतो आणि त्यातून वेळ काढून विद्यार्जन करतो म्हणून आईला त्याचं कौतुक असे. त्यामुळे सुन्याला सुद्धा तो माधुकरी आवडे. एक दोनदा सुन्याने सुद्धा त्याच्या झोळीत आपली रबर पेन्सिल टाकली होती आणि आईने त्याला जवळ घेऊन कुरवाळलं होतं. सुन्याला तेंव्हा ज्याम भारी वाटलं होत.

मोठा सुन्या आता जुन्या आठवणी जागवत असतो. दारावर, अंगणात येणारी माणसं त्या रिती थोडक्यात समाधानी होती. त्यावेळी माणसाच सुख पैश्यात मोजण्याची सोय नव्हती. वस्तू,प्रेम, वात्सल्य, आपुलकी ह्या गोष्टी पैशापेक्षा फार मोठ्या होत्या आणि हीच सुन्याची, त्याच्या आई बाबाची आणि त्यांच्यासारख्या अनेक पार्लेकरांची पिढीजात वारसा हक्काने आलेली अतोनात श्रीमंती होती.



सी.ए.केदार अनंत साखरदान्डे
९८३३४ ७७२३३

# डॉ. मेधा पेठे यांच्या कारकिर्दीचा रौप्यमहोत्सव



ख्यातनाम दंतवैद्य मेधा पेठे यांच्या कारकिर्दीचा रौप्य महोत्सवी सोहळा नुकताच १५ जानेवारी रोजी पेठे बिल्डिंग चित्तरंजन रोड येथे पार पडला. डॉ मेधा पेठे यानी अमेरिका, इटली, इस्त्रायल यासारख्या देशात जाऊन दंत वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षण घेतलेले आहे. Navigation implantology वापरुन भारतात सर्वप्रथम implant टाकण्याचा मान त्यानी मिळविलेला आहे. एव्हढच नव्हे तर ही technology वापरुन सहा implants टाकण्याचा जागतिक विक्रमही त्यांच्या नावावर आहे.

याप्रसंगी माजी कुलगुरु डॉ. स्नेहलताबाई देशमुख, डॉ. अलकाताई मांडके, विद्यमान खासदार पुनमताई महाजन मुंबई प्रदेश भाजपाध्यक्ष श्री. आशिष शेलार, आमदार ॲड. पराग अळवणी आणी विलेपार्ल्यातील विविध डॉक्टर आणि मान्यवर उपस्थित होते .

डॉक्टर स्नेहलताबाई देशमुख यांनी 'डिजिटल स्कॅनर' या डॉ. मेधा पेठे यांनी घेतलेल्या नवीन मशीनचे उद्घाटन केले. नंतर डॉक्टर मेधा पेठे यांनी भाषणातून या नवीन तंत्रज्ञानाचे महत्त्व विशद केले. त्या म्हणाल्या की या मशीनमुळे ट्रीटमेंटची अचूकता कितीतरी पटीने वाढते.



डॉक्टरला पेशंट व लॅबशी सुसूत्रपणे व सहजतेने संवाद साधता येतो. ऑर्थो डॉंटिक किंवा अँटीस्नोरिंग ट्रीटमेंट या सारखे किचकट उपचार सुलभ होऊन जातात. एकंदरीतच संपूर्ण निदान व उपचार याकरता या मशीनचा खूपच फायदा होतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पेशंटचा वेळही भरपूर वाचतो. डॉ. स्नेहलता देशमुख आणि डॉ. अलका मांडके यांनीही आधुनिक तंत्रज्ञानाचा संपूर्ण समाजाला कसा फायदा होतो ते समजावून सांगितले. ॲड. पराग अळवणी यानी चतुरस्त्र भाषण करुन सर्वांची मने जिंकली.






# रंगुनी रागांत साऱ्या

## भीमपलास, कर्णमधुर आणि गंभीरही

हा काफी थाटातील प्रेमळ आणि शांत रस निर्माण करणारा राग. नावातील भीम हा उगाच घाबरवतो. हा राग ऐकल्याने बेचैनी, anxiety कमी होते असे कोणीतरी सिद्ध केले आहे. अतिशय कर्णमधुर आणि छान वातावरण निर्मिती करणारा हा औडव संपूर्ण असा राग. कर्नाटकी संगीतात आभेरी म्हणून ओळखला जातो किंवा बराच जवळचा आहे. थोडक्यात वर जाताना पाच सुरात वर आणि खाली येताना सर्व सात सूर. प्राणायाम मध्ये श्वास घेताना जसा लवकर घेऊन आणि सोडताना सावकाश सोडला जातो तस काहीस. भजन प्रकारातील भीमसेनजींचा लक्षात राहिलेला अभंग 'इंद्रायणी काठी' या रागातील आणि समर्पक लक्षणगीत.

या रागाच्या गोडीमुळे माणसेच काय तर प्राणीसुद्धा मंत्रमुग्ध होतात असे म्हणतात. कृष्ण चरायला सोडलेल्या आपल्या गाई परत बोलावण्यासाठी हा राग बासरीवर वाजवत असे अशी आख्यायिका आहे. संध्याकाळी गोरज मुहूर्तावर म्हणूनच बहुतेक हा वाजवला जातो. मराठी वातावरणात तत्वज्ञान सांगणारे वेगळे गाणे आले कि हा राग नक्की. 'मधू मागशि माझ्या सख्या परी ', 'काटा रुते कुणाला' किंवा 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख'.

भावगीतामध्ये अपवादात्मक 'तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे' यशवंत देवांचे. बाबूजी (सुधीर फडके ) गाणार म्हणजे शब्द आणि सूर स्पष्ट. गाण्यात श आणि ष चा वेगळा उच्चार करणारे एकमेव गायक. ते हयात असते तर मी हे भक्तीगीत असताना भावगीत का म्हटलंय अशी माझी उलट तपासणी झाली असती. असो.

हिंदी चित्रपटातील गाण्यात जुन्या संगीतकारांपासून ते नवीन पर्यंत सर्वांचा लाडका राग भीमपलास. लताचा आवाज एकदम suitable. 'ये जिंदगी उसिकी है', 'कुछ दिलने कहा' अजूनही लक्षात असतील. मदन मोहनने थोडीच गाणी केली या रागात पण काय गाणी आहेत एकसे एक, 'नैनोमे बदरा छाये' मेरा साया चित्रपट, 'तुम जो मिल गये हो, तो ये लगता है'. 'नम्म और शेर की सौगात किसे पेश करु'. इतरही संगीतकार प्रयत्नशील होते. 'ओ बेकरार दिल'. 'खिलते है गूल यहाँ' वगैरे.

या रागावर खऱ्या अर्थाने प्रेम केले ते आधुनिक काळातील A.R. Rehman यांनी. त्यांनी प्रत्येक चित्रपटात एखादे गाणे केलेच यात.

' ए अजनबी तू भी कभी '

'राधा कैसे नं जले '

'तन्हा तन्हा यहापे जिना '.

प्रत्येक गाणे अगदी वेगळं आहे पण सुरावट आणि मींड भीमपलास खास. रहमानची स्वाक्षरी प्रत्येक गाण्यात आहे पण आता तुम्ही पण गाऊन बघा, रागाची ओळख नक्की पटेल तुम्हाला. आयुष्मान खुराणा हा काही मोठा गायक नाही पण या रागातील सोपे गाणे त्याला प्रसिद्धी देऊन गेले. 'पाणी दा रंग '.

एका नायिकेचं करियर बदललं एका गाण्याने. रवीना टंडन ही रातोरात फेमस झाली कारण हे गाणे. 'तू चीझ बडी है मस्त मस्त'. नाच, चित्रीकरण सामान्य पण भीमपलास सरगम मात्र भाव खाऊन गेली. 'प, नी, सा' आठवत असेल तर गुणगुणून पहा . विजू शाह संगीतकार, या एका गाण्यावर picture आणि हिरोईन हिट. असत एकेकाचे नशीब. असो.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

# पाहुणा पाल्याचा

इंग्रजी नवीन वर्षातला म्हणजे २०२३ सालचा पार्लेकट्टा खचितच वेगळं रुप असलेला ... मुलाखतीचे मायने बदलणारा!!

मुक्त व्यासपीठात नववर्षाचं स्वागत व काही खास गीतं पेश केली ते स्वरलक्ष्मी ग्रुपने.... त्यातल्या एका गीताने महिला श्रोत्या थोड्या सुखावल्या असणार. रोजच्या स्वयंपाकातली आयुधं वापरताना त्यातला स्वर नाद जाणवत नाही..पण तोच स्वयंपाक आनंदाने केला जात असेल तर त्याच आयुधांतला अंतर्नाद निश्चितच एक उर्जादायी असावा...

पार्लेकर नागरिकांच्या रोजच्या धकाधकीतल्या पण अनवधानाने घडणाऱ्या सायबर गुन्ह्यांबद्दल विलेपार्ले पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री गोपाळ भोसले यांनी घडलेल्या काही उकल केलेल्या केसेसची छान माहिती दिलीच...

पण अशा चुका परत होऊन आयुष्यभराच्या कमाईवर तुळशीपत्र ठेवायची वेळ येऊ नये असा महत् सल्लाही दिला....'सद्रक्षणाय...खल निग्रहणाय' या ब्रीद वाक्याचा पुनरुच्चार करत एक भरवसाही दिला... गोपाळसरांना बरंच काही सांगायचं होतं ..पण शेवटी वेळेची मर्यादा आड आली...

**मुख्य पाहुणे ..**

पार्लेकट्टाचं भाग्य महान की आत्तापर्यंत लाभलेल्या अनेक थोरांच्या मांदियाळीत एक नाव अजून खास ठरावं....

'Order of Australia' या ऑस्ट्रेलियाच्या सर्वोच्च नागरी पदकाने सन्मानित ज्याची तुलना भारत देशाच्या 'पद्मविभूषण' शी व्हावी..असे मूळ भारतीय पण आता ऑस्ट्रेलियाचे नागरिक असलेले डॉ. विजय जोशी... टाकाऊ पासून अती टिकाऊ महामार्ग, विमानतळ व रेल्वे धावपट्ट्या बांधताना ते पर्यावरणपूरक व कमी खर्चाचे होतील..यात भरीव मोलाची कामगिरी करणारे स्थापत्य संरचना अभियंता (Structural Engineer)..

लोखंड व पोलाद कारखान्यांत जेव्हा लोह खनिजांवर प्रक्रिया केली जाते त्यात ८०% शुद्ध लोह व २०% मळी SLAG तयार होते.सर्व कारखान्यांना या स्लॅगचा निपटारा कसा करायचा हा कायम भेडसावणारा प्रश्न..उत्तर शोधतानाच त्याचे अनेक थरांचे डोंगर होतात. कारखान्यातली बहुमूल्य जागा व्यापली जाते..

ही सर्व जगभर असलेली समस्या होती. डॉ. जोशी नोकरीसाठी स्थलांतरीत झाले मात्र...भरपूर विचार व अखंड संशोधन करत शेवटी बोगद्यापलिकडचा उजेड दिसायला लागला..

महामार्ग रस्ते बांधताना डोंगर फोडून निर्माण झालेली जी खडी वापरली जाते त्याऐवजी जर ही स्लॅग वापरली गेली तर रस्ते अधिक चांगल्या दर्जाचे होतीलच पण खर्चात भारी बचत होऊन पर्यावरणाचं रक्षणही होईल..इतका क्रांतीकारक..

पण अशा भविष्य बदलणाऱ्या सूचना पटकन स्वीकारल्या जात नाहीत..पण दोन वर्षांनंतर का होईना.. डॉ.जोशींचं संशोधन प्रत्यक्षात अंमलात आलंच..सिडनी विमानतळाची तिसरी धावपट्टी अनेक महामार्ग जगभरात याचा योग्य गवगवा झाला....यथावकाश एका ठाणेकराचं त्याच्याच मायदेशी त्याने केलेल्या कामाचं कौतुक झालं...ते आता केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरींच्या खात्याचे सल्लागारही आहेत...

हा सर्व पट डॉ.जोशींनी एका प्रेझेंटेशनद्वारे श्रोत्यांसमोर अलगद उलगडून दाखवला.. बरीचशी क्लिष्ट तांत्रिक माहिती सोपी करून सांगितली...भविष्यातले भारतातले रस्ते, महामार्ग, धावपट्ट्या काय दर्जाच्या अशाव्यात याबाबत भाष्यही केलं..

या सर्व प्रवासात त्यांच्या विद्याविभूषित सहचारिणी सौ. मानसी जोशी यांची मोलाची साथ लाभलीय. थोड्या कोपरखळ्या मारत हा कौटुंबिक संवादही रंगला..

श्रोत्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देत माझ्याकडे सांगण्यासारखं अजून बरंच काही आहे ही ग्वाहीही दिली..

घड्याळातल्या काट्यांनी आठ वाजल्याची जाणीव करून दिल्यावर मात्र..पूर्णविराम ...

जागतिक नाव झालेले डॉक्टर जोशी पार्लेकट्टा वर कोणताही अभिनिवेश न आणता सुंदर व्यक्त झाले यातच त्यांचं मोठेपण...

पार्लेकट्टा अधिक श्रीमंत धीमंत झाला...



अमरेंद्र करंदीकर
९८२०० ९६२१९

# पार्ले स्वर वसंत




पूर्वी 'पार्ले वसंतोत्सव' म्हणून ओळखला जाणारा शास्त्रीय संगीत महोत्सव २०१४ मध्ये सुरू झाला होता. कोविड आणि इतर अनेक कारणांमुळे गेल्या ४ वर्षांपासून तो आयोजित करण्यात आला नव्हता. आता त्याचे नाव बदलून 'पार्ले स्वर वसंत' असे नामकरण करण्यात आले आहे.

ख्यातनाम शास्त्रीय गायिका गौरी पाठारे यांच्या पुढाकाराने दरवर्षी वसंत पंचमीच्या आसपास हा शास्त्रीय संगीत उत्सव साजरा होतो. नवोदित तसेच ज्येष्ठ कलाकारांची कला सादर करणे हा या महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. या वर्षी २६ ते २९ जानेवारी दरम्यान देशा-विदेशातील अनेक गुणवान कलाकारांसह 'पार्ले स्वर वसंत' आपल्या भेटीला येत आहे. कार्यक्रम विनामुल्य असून सर्व रसिकांनी ह्याचा आस्वाद घ्यावा ही विनंती.

# प्रज्ञा राजे यांचे चित्र प्रदर्शन

पार्ल्यातील चित्रकर्ती श्रीमती प्रज्ञा राजे यांच्या निवडक चित्रांचे प्रदर्शन सहार इंटरनॅशनल




एअरपोर्ट जवळील दि लीला हॉटेल येथे भरले होते.

या चित्र प्रदर्शनात शंख आणि फ्लॉवर्स अशा दोन सिरीजमधील पेंटिंग्ज मांडली असून शंख सिरीजमध्ये कॅनव्हासवर ॲक्रीलिक्स रंगमाध्यमातील अध्यात्मिक विषयावरची पेंटिंग्ज होती.

फ्लॉवर्स सिरीजमध्ये कागदावर जलरंग माध्यमातील वेगवेगळ्या वैविध्यपूर्ण फुलांची पेंटिंग्ज होती.

श्रीमती प्रज्ञा राजे यांची मुंबईत तसेच भारतात काही ठिकाणी याआधी काही सोलो तसेच ग्रुप प्रदर्शने झाली आहेत.

नुकतेच सोमवार दि. ९ जानेवारी रोजी सुरू झालेले हे एकल चित्रप्रदर्शन रविवार दि. १५ जानेवारीपर्यंत चित्र रसिकांसाठी खुले होते.





# त्सिंगीची असिधारा यात्रा

आपल्या पुराणांतील अनेक व्रत-वैकल्यांपैकी पाळायला सर्वात कठीण व्रतांचं वर्णन 'असिधाराव्रत' असं केलं जातं. 'असिधाराव्रत' म्हणजे शब्दश: - तलवारीच्या धारेवर चालण्या एव्हढं कठीण व्रत!

'त्सिंगी' ह्या मालागासे (मादागास्करमधील लोकांच्या) भाषेतील शब्दाचा अर्थही सुरीच्या (किंवा करवतीच्या) धारेचं क्षेत्र असाच काहीसा आहे. त्सिंगीला जाण्याची वाट सुरु होते बेकोपका ह्या मादागास्करमधील गावाजवळील मानाम्बोलो नदीच्या उत्तर किनाऱ्यापासून. ती वाटही अशीच सर्वत्र पसरलेल्या तलवारीसारख्या धारदार चुनखडीच्या दगडांच्या पात्यांमधून जात असल्यामुळे, तिथे जाणं हे एखादं 'असिधाराव्रत' पाळण्यासारखंच आहे.

चुनखडीच्या उंच कडेकपारी कापत जाणारी संत्र्याच्या रसासारख्या नारिंगी रंगाची मानाम्बोलो नदी आणि त्या कपारींत पाण्याने धुपून तयार झालेल्या चित्रविचित्र गुहा हा ही एक अजब चमत्कार आहे पण त्याबद्दल पुन्हा कधीतरी (आज फक्त हा एक वानगी दाखल **फोटो - पहिला)**.



ज्या खोल खिंडीतून नदी वहात बेकोपकाकडे येते त्याच्याच वरील कडेकपारींमध्ये त्सिंगीचं हे उभारलेल्या सुऱ्यांचं शेत साडेतीन लाख एकर क्षेत्रामध्ये पसरलेलं आहे. सुमारे वीस कोटी वर्षांपूर्वी त्सिंगी बनवायला निसर्गाने सुरुवात केली असावी. प्रथम समुद्रतळावर मृत सागरी जीवांच्या अवशेषातील कॅल्शिअमची संयुगे जमून limestone (चुनखडीचा दगड) चा थर निर्माण झाला. तदनंतरच्या भूगर्भातील उलथापालथीमुळे हे चुनखडीचे डोंगर पाण्याच्या शेकडो, हजारो फूट वर आले. शतकानुशतकांच्या पावसाच्या धारांनी कातून त्यातील सर्वात कठीण भागाचे उंच उंच अणकुचीदार सुळके शिल्लक ठेवले. त्याच बरोबर जमीनीच्या पृष्ठभागावर वाहणाऱ्या नदी-नाले-झऱ्यांनी ह्या डोंगरांचा पाया पोखरून त्यांच्या गर्भात विस्तीर्ण गुहा खोदल्या. एकाच वेळी दोन्ही बाजूने होणाऱ्या ह्या निसर्गाच्या खोदकामामुळे बहुतेक गुहांची छतं विच्छिन्न होऊन उभारलेल्या भाल्याच्या फाळासारखे किंवा करवतीच्या पात्यासारखे त्यांचे तुकडे मात्र शिल्लक राहिले. हेच आजचं त्सिंगी!

मात्र हे अद्भुत पाहायला जावं लागतं, त्सिंगीच्या माथ्यावर - जिथून दूरवरपसरलेलं हे निसर्गशिल्पाचं रौद्र नीट निरखता येतं. माथ्यावर जाणाऱ्या वाटेची सुरुवात होते एका दरडीतील **(दुसरा फोटो)** चिंचोळ्या फटीपासून. तुम्ही जर Lord of the Rings : Return of the King हा गाजलेला सिनेमा पाहिला असेल तर त्यात सिनेमाचा हिरो अरागॉर्न ज्या पिशाच्च्यांच्या वाटेने (Paths of the Dead) जातो, त्याचा दरवाजा हुबेहूब त्सिंगीच्या ह्या वाटेसारखाच



दिसतो! अर्थात अरागॉर्नला जसा भूत-पिशाच्च्यांच्या सेनेशी सामना करावा लागला तसं काही चित्तथरारक आमच्या वाटेला आलं नाही. पण आमची वाटही प्रसंगी अभिमन्यूच्या चक्रव्यूहासारखी फसवी मात्र होती. एकतर अतिशय चिंचोळी - काही ठिकाणी तर इतकी, की माझी शरीरयष्टी जरी तशी बारीकातच जमा होणारी असली (अर्थात माझ्या बायकोचं ह्याबद्दल दुमत आहे - पण ते सोडा) तरी पाठीवरील बॅकपॅक डोक्यावर धरून खेकड्यासारखं तिरकं तिरकं किंवा काही ठिकाणी कंबर काटकोनात दुमडून वाकलेल्या

देशोदेशी









आजीबाईसारखं चालावं किंवा चक्क रांगावं लागत होतं. **पहा पुढचे दोन फोटो.** दोन्ही बाजूला उंच उभे कडे असल्यामुळे **(पहा पाचवा फोटो)** झापडं बांधलेल्या बैलासारखं फक्त नाकासमोरचं तेवढं दिसत होतं. त्यामुळे आपण नक्की कुठे चाललो आहोत, आपल्या इष्ट दिशेने काही प्रगती करत आहोत की एकाच वर्तुळात चकवा लागून गोल फिरतो आहोत हे सांगणं कठीण होतं. त्यात पुन्हा चालताना पायाखालच्या वाटेवरचं लक्ष ढळून चालणार नव्हतं कारण, वरवर चढत जाणाऱ्या ह्या वाटेच्या दोन्ही बाजूला धारदारकपारी होत्या आणि खाली वाटेच्या तळात करवतीच्या पात्यासारख्या आकाराच्या शिळा पसरलेल्या होत्या. पाय अडखळून खाली पडलं तर डोकं आपटून फुटण्याआधी शिरच्छेदच व्हायची शक्यता जास्त होती आणि पडू नये म्हणून शेजारच्या कपारीवर हात ठेवून आधार घेतला तर शाहिस्तेखानासारखी बोटंच कापली जायची भीती होती.

मात्र त्सिंगी नॅशनल पार्कच्या कर्मचाऱ्यांनी ही वाट शक्य तेवढी सुरक्षित करण्यासाठी खूप कष्ट घेतले आहेत त्याची वाखाणणी करायलाच हवी - दिशादर्शक खुणा, फार अवघड जागी चढायला मदत व्हावी म्हणून बांधलेल्या दोऱ्या, अगदीच अशक्य दरी असेल तेथे ओलांडायला टाकलेल्या फळ्या आणि सर्व काही वापरण्याजोग्या अवस्थेत!


आमच्या वाटाड्याच्या पावलावर पाऊल टाकत जेंव्हा आम्ही त्सिंगीचा माथा गाठला तेंव्हा



समोर पसरलेला उभ्या भाल्याच्या फाळांचा सागर मात्र तिथपर्यंत पोचण्यासाठी केलेल्या सर्व कष्टाचं सार्थक करणारा होता - शब्दश: Breathtaking: वरचा श्वास वरती आणि खालचा श्वास खाली राहील असा. **पाहा शेवटचे 3फोटो.**

नैसर्गिकरीत्या बनलेली, थक्क करणारी वगाताळ-शिल्प (Stalactites, Stalagmites) मी ह्या पूर्वीही अनेक ठिकाणी पाहिली आहेत, विशेषत: जिथे limestone किंवा तत्सम Calcite ह्या खनिजाचं प्रमाण अधिक असलेले खडक प्रामुख्याने असतात अशा ठिकाणी ही निसर्गनिर्मित शिल्प अनेकदा आढळतात. उदाहरणार्थ, आपल्या अंदमानमधील बाराटांग बेटावरील गुहा किंवा विएतनाम मधील हालोंग बे मधील बेटांवरील गुहा. पण त्सिंगी सारखा भूप्रदेश मात्र मी तरी कधीच पाहिला नव्हता.





सतीश जोशी
९८२०२२८२७९

# बेनब्रीज कप - पिकलबॉल विश्वचषक २०२२

दिनांक ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रथमच भारतात पिकलबॉल विश्वचषक २०२२ बेनब्रिज चषक या नावाने मुंबईत भरवला गेला. पाचव्या बेनब्रिज चषकाचे



यजमानपद अखिल भारतीय पिकलबॉल संघटनेने स्विकारले होते. सहा दिवस खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत एकंदर नऊ देश व अंदाजे ४५० खेळाडूंचा सहभाग होता. ही स्पर्धा एन.एस.सी.आय (वल्लभभाई पटेल इंडोरस्टेडियम) येथे खेळवली गेली. या स्पर्धेचे




उद्घाटन माजी पर्यावरण व पर्यटन मंत्री तथा युवासेनेचे अध्यक्ष मान. आदित्य ठाकरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून जागतिक खेळाडूंना संबोधताना शारिरीक क्षमता वाढविणाऱ्या या खेळात भारतीय आणि विशेषत: महाराष्ट्रीय खेळाडूंनी याला सहभाग दर्शविल्यास पिकलबॉल या खेळास उज्वल भवितव्य प्राप्त होईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या खेळास राष्ट्रीय पातळीवर प्रोत्साहन दिल्याबद्दल व अहोरात्र मेहनत घेतल्याबद्दल




क्रीडा संचालक चेतनसनिल, अध्यक्ष अरविंद प्रभू तसेच सहसंचालक ओमकुबल व गोपाल टिकमणी यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. भारतातर्फे खेळलेल्या अनेक खेळाडूंसह जेष्ठवयोमानाचेही अनेक खेळाडू या विश्वचषक स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत एकूण पाच वयोगटांना सामिल करुन घेऊन एकंदर ६० विभागात पारितोषिकांचे विभाजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे भारतात आयोजित केला गेलेला बेनब्रिज चषक आजपर्यंतच्या सर्वाधिक पारितोषिक रकमेचा म्हणजेच रुपये ४० लाख रकमेचा होता. या स्पर्धेचे आयोजन करण्यामागे एन.एस.सी. आय. चे अध्यक्ष विरेन शहा आणि त्यांच्या क्लब कार्यकारिणीने अतोनात परिश्रम घेतले.

# व्हिक्टोरिया - एक रहस्य

२०२३ सुरु झालं आणि विविध विषयांवरचे चित्रपट या महिन्यापासूनच प्रदर्शितहोऊ लागले आहेत.याच महिन्यात प्रदर्शित झालेला एक मराठी भयपट म्हणजे'व्हिक्टोरिया - एक



रहस्य'. सिद्धार्थ आणि अंकिता हे एक जोडपं स्कॉटलंड येथे येतं . सिद्धार्थाचा काका अधिराज याचं व्हिक्टोरिया नावाचं एक हॉटेलअसतं . तेथे ते दोघे राहायला येतात. अधिराज अनेक वर्ष त्याच्या हॉटेलमध्ये एकटाच राहत असतो. त्याच्या पत्नीचा मृत्यू झालेला असतो.

हॉटेलमध्ये एक निर्बंधित क्षेत्र आहे , तिथे जाऊ नका, असं अधिराजने सिद्धार्थ आणि अंकिताला सांगितलेलं असतं . पण त्या हॉटेलमध्ये राहू लागल्यावर अंकिताला काही भास होऊ लागतात. ती एकदा त्या निर्बंधित क्षेत्रात जाते आणि मग एका वेगळ्या नाट्याला सुरुवात होते . ते नाट्य काय आहे, हे जाणून घेण्यासाठी तुम्हाला 'व्हिक्टोरिया ' पाहावा लागेल. या चित्रपटाचे चित्रण हे स्कॉटलंडमध्ये झाले आहे . तसेच चित्रपटाचं संगीतही एक अतिशय जमेची बाजू आहे . हॉरर चित्रपटांना जे पार्श्वसंगीत आवश्यकआहे, त्याच पद्धतीचे संगीत आपल्याला इथे दिसते.

या चित्रपटाची कथा ओंकार गोखले आणि जीत अशोक यांची असून पटकथा विराजस कुलकर्णी याने लिहिली आहे . तसेच चित्रपटाचे दिग्दर्शन विराजसकुलकर्णी आणि जीत अशोक यांचे आहे . सिद्धार्थच्या भूमिकेत अभिनेता आशय कुलकर्णी आहे, तर अंकिताची व्यक्तिरेखा सोनाली कुलकर्णी हिने साकारली आहे.

अधिराजच्या भूमिकेत पुष्कर जोग आहे . केवळ तीन व्यक्तिरेखांचा हा सिनेमा आपल्याला खिळवून ठेवतो. आनंद पंडित, रूपा पंडित आणि पुष्कर जोग हे याचित्रपटाचे निर्माते आहेत, तर वैशलशाह आणि राहुल दुबे सहनिर्माते आहेत.

मनोरंजन विश्व

# पिकोलो

संगीत हा धागा घेऊन एक संगीतमय चित्रपट २६ जानेवारीला प्रदर्शित होत आहे. त्या चित्रपटाचे नाव आहे 'पिकोलो'. फोर्टिगो मोशन पिक्चर प्रा. लि. प्रस्तुत आणि अभिजीत मोहन वारंग दिग्दर्शित 'पिकोलो' या मराठी चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. राजेश मुद्दापूर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. आजच्या पिढीसमोर असणारे प्रश्न, त्यांना पेलावी लागणारी आव्हानं या साऱ्याचं चित्रण करत नातेसंबंधांचे सूक्ष्मपदर संगीताच्या माध्यमातून अलगदपणे उलगडून सांगणारा 'पिकोलो' हा संगीतमय चित्रपट आहे. या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच श्री क्षेत्र शिर्डी येथे साईबाबांच्या चरणी अर्पण करण्यात आले. प्रत्येकालाच आयुष्यात काही ठोस असे ईप्सित साध्य करायचे असते, त्यात अनेक अडथळे येतात, त्यावर मात करून पुढे जायचे असते. या चित्रपटातही हा संघर्ष आहे. ही व्हिक्टर आणिप्रीतीची कथा आहे . यात प्रणव रावराणे आणि अश्विनी कासार यांच्या मुख्य भूमिका आहेत. राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिजितवारंग यांनी याचित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे . 'पिकोलो' चित्रपटात प्रणव आणि अश्विनी यांच्याबरोबर किशोर चौघुले, अभय खडपकर, दीक्षा पुरळकर, नमिता गावकर, पद्मा वेंगुर्लेकर, विश्वजीत पालव, मिलिंद गुरव, हर्षद जाधव, रघु जगताप, रोहन जाधव, हर्षद राऊळ, शुभम सुतार, हर्षदपरब, विद्याधर कार्लेकर आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा प्रमोद शेलार यांची आहे. हा संगीतमय चित्रपट नक्कीच लोकांना आवडेल.






गणेश आचवल
९८२१२६८३९१